# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'सप्तरंग' कार्यक्रमाचे आयोजन

प्रा.डॉ.रजनी भोयर

जनता शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालित श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन 'सप्तरंग' २०२२ च्या माध्यमातून करण्यात आले असून दि. २ मार्च २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता 'सप्तरंग' कार्यक्रमाचे उद्घाटन तसेच महिला विकास समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले. 'सप्तरंग' उद्घाटन सोहळा तसेच महिला विकास समुपदेशन कार्यशाळेचे उद्घाटन सोहळा तसेच महिला विकास कार्यशाळेचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.टी.पाटील, पुसद बार कौन्सिलच्या अध्यक्षा अॅड. वनिता पवार, अॅड भारती शामसुंदर, अॅड.अर्चना शिंदे, कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ.वंदना वानखेडे, सदस्य डॉ.रंजना भोयर, प्रा.सुरेखा भगत तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक बंधु आणि भगिनी ह्यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाचे आराध्यदैवत वत्सलाबाई नाईक ह्यांच्या प्रतिमेचे हार अर्पण करून तसेच दिपप्रज्वलन करून संपन्न झाला. प्राचार्य डॉ.जी.टी.पाटील ह्यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन झाले म्हणून घोषीत केले. त्यानंतर मान्यवरांचे मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून प्राचार्य डॉ.जी.टी.पाटील, डॉ.वंदना वानखेडे, डॉ.रजनी भोयर यांनी स्वागत व सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.वंदना वानखेडे यांनी केले.

दिनांक २ ते ८ मार्च पर्यंत घेण्यात आलेल्या 'सप्तरंग' कार्यक्रमामध्ये दि. ३ मार्च २०२२ रोजी 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा' व 'स्वयंरोजगार विकास कार्यशाळा' महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. ह्या कार्यशाळेचे उद्घाटन पीएसआय अनिल सावळे यांच्या हस्ते करण्यात आले तर स्वयंरोजगार विकास कार्यशाळेचे उद्घाटन व मार्गदर्शन 'गांव माझा उद्योग' समूहाचे वाशिम जिल्हा समन्वयक सुरेश इंगोले ह्यांनी केले तर रिता कांबळे मॅडम ह्यांनी सुंदर मार्गदर्शन केले. ह्या कार्यक्रमाचे आयोजन मनोहरराव नाईक स्टडी सर्कल व स्वयंरोजगार विकास समिती तसेच 'सप्तरंग' कार्यक्रमांतर्गत घेण्यात आला.

दि. ४ मार्च २०२२ रोजी संत डोला महाराज वृध्दाश्रम उमरी पठार ता.आर्णी जि.यवतमाळ येथे ११३ वृध्दांना सप्तरंग कार्यक्रमाच्या डॉ.रजनी भोयर, डॉ.अरुणा पवार, डॉ.वैशाली पांडे, डॉ.छाया जतकर, डॉ.रवी चापके तसेच २५ विद्यार्थीनींच्या समवेत भेट दिली. वृध्दांना भेट म्हणून कुलर देण्यात आला व सर्वासाठी भोजनाची व्यवस्था केली. सर्वांनी ग्रेट सेवाव्रती श्री.डोंगरे ह्यांच्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

दि. ५ मार्च २०२२ रोजी बॅडमिंटन व योगासन स्पर्धेचे भव्य उद्घाटन करण्यात आले. ७ मार्च पर्यंत विविध गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. ह्या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा प्राचार्य डॉ.जी.टी.पाटील ह्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. उद्घाटक म्हणून ह्रदयरोग तज्ञ डॉ.नकुल कदम, प्रमुख पाहुणे डॉ.ईशा कदम, मा.दिपकभाऊ काळे, प्रा.राजीव कांडलकर, डॉ.दयाराम जाधव, डॉ.प्रकाश राठोड, डॉ.तळणकर तसेच अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. दि. ८ मार्च रोजी ३ वाजता कॉन्फरन्स हॉलमध्ये पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.टी.पाटील हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून बॅडमिंटन असोशिएशनचे अध्यक्ष डॉ.दयाराम जाधव, डॉ.आशाताई कदम, मा.सौ.सोनल ययाती नाईक तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. विजयी खेळाडूंना रोख रक्कम तसेच ट्राफी देवून सन्मानीत करण्यात आले.

दि. ५ मार्च २०२२ रोजी मैनाबाई नगर, जोशीपुरा व पारधी बेडा येथे सिकलसेल तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. जवळपास १०० लोकांचे रक्त तपासणी करण्यात आली. उपजिल्हा रुग्णालयातील संपूर्ण चमू उपस्थित होती. डॉ.पडोळे ह्यांनी परिश्रम घेतले. सिकलसेल तपासणी शिबीरानंतर जवळपास पन्नास कुटुंबियांना वस्त्रकोषाचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये साडी, ड्रेस, पेटीकोट, ब्लाऊज, बॅग्ज तसेच इतर साहित्याचे वाटप मोठया प्रमाणात करण्यात आले

दि. ६ मार्च २०२२ रोजी गीतगायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयीन गट व खुल्या गटामध्ये ह्या स्पर्धा घेण्यात आल्या. जवळपास ५० विद्यार्थीनींनी यामध्ये सहभाग नोंदविला. दि. ८ मार्च रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत रोख रक्कम स्वरुपात पारितोषीक देण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतकरीता डॉ.साधना मोहोड, श्री.संजय सोनटक्के, डॉ.अंजली पांडे,



Off Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya. pusad

CamScanner

डॉ.छाया जतकर ह्यांनी परिश्रम घेतले. स्पर्धेच्या परिक्षक म्हणून सौ.स्वप्ना गोडबोले, प्रा.संजय कोरटकर, श्री. प्रमोद जयस्वाल यांनी कार्य केले.

दि. ७ मार्च २०२२ रोजी ३ वाजता 'कौशल्य विकास' कार्यशाळेच आयोजन करण्यात आले होत. ह्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.टी.पाटील, मार्गदर्शक म्हणून महिला आर्थिक विकास महामंडळाच्या संचालिका श्रीमती अश्विनी पुनवटकर तसेच तज्ञ प्रशिक्षक श्रीमती सपना राठोड तसेच महाविद्यालयाच्या गृहविज्ञान विभागाच्या कौटुंबिक संसाधन व्यवस्थापन विषयाच्या प्रा.डॉ.उज्वला कांडलकर ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. जवळपास पुसद शहरातील निरनिराळ्या बचतगटातील सुमारे ५० महिला ह्या कार्यशाळेस उपस्थित होत्या.

दि. ८ मार्च २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित ७ दिवसीय महिला सक्षमीकरण व सामाजिक बांधिलकीयुक्त कार्यक्रमाचा समारोप सोहळा आयोजित करण्यात आला होता या प्रसंगी कर्तृत्ववान महिलांचा सत्कार व विविध स्पर्धांमध्ये विजयी स्पर्धकांना पारितोषीक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.टी.पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.दयाराम जाधव, डॉ.आशाताई कदम, मा.सौ.सोनल ययाती नाईक तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत समारोपीय सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रवी चापके ह्यांनी केले तर परितोषीक वितरण सोहळ्याचे सुत्रसंचालन डॉ.साधना मोहोड ह्यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ.रजनी भोयर ह्यांनी केले.

Principal
Smt. Vatsalabai Naik Mahila Mahavidyalaya, Pusad

Saptrang - 2022.




Guest lecture on legal awareness on Domestic Violance and right of Women. (02/03/2022)

Off Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, pusad

CamScanner

Saptrang - 2022.




Cloth distribution to the needy near by slum area through Cloth bank of our college 05/03/2022.




Off Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, Pusad

CamScanner

Saptrang 2022




Blood group, Sickle cell detection camp at. Joshipura, Pusad. (05/03/2022)




Off Principal
Smt. Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, Pusad

CamScanner

Saptrang.




Cloth Bank activity.




Sports for Women.
05/03/2022

Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, Pusad

CamScanner

Saptrang 2022




Workshop on Bag making for 'Mahila Bachat Gat':- self employement. 07/03/2022.




Women active participation.

Off Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya. pusad

CamScanner

Saptarang-2022




Chief Guest Mrs. Sonal Yayati Naik expressing ~~their~~ her views on world Women Day.




Felicitation of Efficient Women through the hands of Dr. Jadhav.

Off Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya. pusad

CamScanner

Saptrang - 2022




Health worker Ku. Rakhi Namdeo Jadhav. gave her service in Pandemic so felicitation




Auto Driver

BDandekar

Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, pusad

CamScanner

~~Sap~~

Saptrang - 2022




'Women Saftey' - Guidance by PI.

Off Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya. Pusad

CamScanner

Saptrang-2022 - felicitation







Off Principal
Smt.Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, Pusad

CamScanner